सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता विद्यार्थी हरित सेना (२४०६ A१९४) लेखाशीर्षांतर्गत अनुदान वितरण करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः साववि-२०१८/प्र.क्र.७३/फ-११
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २१ मे २०१८

वाचा :-

१) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/प्र.क.६९/अर्थ-३, दि.०२.०४.२०१८.
२) अप्पर प्रधान मुख्य वनसरंक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे क्रमांक कक्ष-१/ पी/ यो/ चाबाप्र/ प्र.क्र.३६/२४०/२०१८-१९, दि. १५.०५.२०१८
३) प्रधान मुख्य वनसरंक्षक, सामाजिक वनीकरण , महराष्ट्र राज्य , पुणे यांचे क्रमांक कक्ष -१/चाबा/ प्र.क्र.०७/३०८७/२०१८-१९, दि. ११.०५.२०१८ चे पत्र.

प्रस्तावना :-

शासनाच्या महत्वाकांक्षी ५० कोटी वृक्ष लागवडीच्या प्रकल्पासाठी विद्यार्थी हरित सेनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पर्यावरणाच्या स्थितीबाबत विविध उपक्रमाद्वारे अद्ययावत माहिती देणे, संवर्धनाच्या प्रत्यक्ष कामात विद्यार्थ्यांना सहभागी करणे इ. उपक्रम राबविण्यात येतात. हे उपक्रम प्रत्येक जिल्हयातील २५० शाळांमधून राबविण्यात येतात. त्यासाठी प्रति शाळा रु. २५००/- इतके अनुदान देण्यात येते. सदर अनुदानाकरिता **मागणी क्र. सी-०७-२४०६, वनीकरण व वन्यजीवन (०१)(००३) शिक्षण व प्रशिक्षण (००)(०४) विद्यार्थी हरित सेना (२४०६ A१९४) या योजनेंतर्गत सन २०१८-१९ करिता रु.२२०.०० लक्ष निधी माहे** मार्च २०१८ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे. सदर योजनेसाठी रु.२२०.०० लक्ष इतका निधी चालू बाब प्रस्तावांतर्गत वितरित करण्याची विनंती प्रधान मुख्य वनसरंक्षक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संदर्भ क्र. ३ च्या पत्रान्वये केली आहे

उपरोक्त योजनेसाठी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या निधीच्या ७०%. रक्कम एप्रिल २०१८ ते डिसेंबर २०१८अखेर या ९ महिन्यांच्या कालावधीकरीता खर्च करण्यास वित्त विभागाच्या संदर्भिय दि. ०२.०४.२०१८ च्या परिपत्रकानुसार मान्यता दिलेली आहे. त्यानुसार अर्थसंकल्पित निधीच्या ७० % म्हणजेच रु. १५४.०० लक्ष निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन आहे.

शासन निर्णय :-

सामाजिक वनीकरण विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या **"विद्याथी हरित सेना (२४०६ A १९४)"** हया योजनेकरिता सन २०१८-१९ या वित्तीय वर्षात एप्रिल २०१८ ते डिसेंबर २०१८अखेर या ९ महिन्यांच्या कालावधीकरीता अर्थसंकल्पीत निधीच्या ७० टक्केच्या मर्यादेत म्हणजेच रु.१५४.०० लक्ष निधी खर्च करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे. विवरणपत्र-१ प्रमाणे निधी वितरणाचा कॅश फ्लो सोबत जोडला आहे.

२. सदर निधीसाठी नियंत्रक अधिकारी म्हणून प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर हे राहतील. त्यांच्याकडे हा निधी सुपूर्द करण्यात येत आहे. मंजूर निधीचे जिल्हानिहाय वाटप करण्यास प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत घ्यावयाच्या कामाची अंमलबजावणी कृती आराखड्याप्रमाणे, विहित कार्यपध्दतीनुसार आणि ठरविलेल्या मुदतीत करण्याबाबत दक्षता घ्यावी. याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना द्याव्यात आणि अंमलबजावणीबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा. मंजूर निधीपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची नियंत्रक अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी.

३. सदर निधी खर्च करताना महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिका व वित्तीय अधिकार नियम पुस्तिका यामध्ये उल्लेख केलेल्या तरतुदींनुसार व वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे.

४. जिल्हानिहाय वितरीत तरतुदीची माहिती व राबविण्यात आलेल्या कार्यक्रमाची/झालेल्या खर्चाचा तपशील शासनास दरमहा विहित प्रपत्रात सादर करण्यात यावा. तसेच योजनेचे संनियंत्रण प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर आणि प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत व्हावे.

५. सदर योजने अंतर्गत होणारा खर्च खाली नमूद केलेल्या लेखाशीर्षाखाली सन २०१८-१९ च्या मंजूर अर्थसंकल्पीत निधीतून वित्त विभागाच्या संदर्भिय दिनाक ०२.०४.२०१८ परिपत्रकासोबतच्या परिशिष्टातील अ.क्र.८ मध्ये नमूद केलेल्या अटींच्या पूर्ततेच्या अधिन राहून खर्ची टाकण्यात यावा.

मागणी क्र. सी-०७
२४०६, वनीकरण व वन्यजीवन
(०१)(००३) शिक्षण व प्रशिक्षण
(००)(०४) विद्यार्थी हरित सेना (२४०६ A१९४)५०- इतर खर्च

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.०२.०४.२०१८ ला अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०५२११७४०३७९४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vijay Ramchandra Khedekar

Digitally signed by Vijay Ramchandra Khedekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b4a0f51184eb8e42644affc326f734133e2da973d24448c2cf323cb1cb2e347e, cn=Vijay Ramchandra Khedekar
Date: 2018.05.21 17:40:56 +05'30'

(विजय खेडेकर)
अवर सचिव, महसूल व वन विभाग

प्रत,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख),महाराष्ट्र राज्य,नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण , महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) (११ वृत्त)
५. वनसरंक्षक , सामाजिक वनीकरण (६ वृत्त)
६. विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण (सर्व जिल्हे)
७. महालेखापाल, (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २ , मुंबई व नागपूर,
८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई ४०० ०३२.
१०. निवासी परिक्षा लेखा अधिकारी,मुंबई
११. वित्त विभाग, व्यय-१०, अर्थसंकल्प-०६ मंत्रालय, मुंबई-३२
१२. कार्यासन अधिकारी, फ-२,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१३. कार्यासन अधिकारी, ब-१,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१४. उप सचिव/अवर सचिव (सर्व), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१५. निवडनस्ती/फ-११.

विवरणपत्र -१

सावविं-२०१८/प्र.क्र.७३/फ-११ दि. २१ मे, २०१८ चे सहपत्र

योजनेचे नाव:- “ विद्यार्थी हरित सेना ” मुख्यलेखाशीर्ष :- (२४०६ A१९४)

(रु. लाखात)

सविस्तर लेखाशीर्ष	२०१८-१९ करिता अर्थ-संकल्पित तरतूद	वित्त विभागाच्या दि. ०२.०४.२०१८ च्या परिपत्रकानुसार वितरणासाठी उपलब्ध तरतूद	एप्रिल २०१८	मे २०१८	जुन २०१८	जुलै २०१८	ऑगस्ट २०१८	सप्टेंबर २०१८	ऑक्टो. २०१८	नोंव्हे. २०१८	डिसें. २०१८	एकूण वितरित निधी
१	२	३	४	५								६
मागणी क्र. सी-०७ २४०६, वनीकरण व वन्यजीवन (०१) (००३) शिक्षण व प्रशिक्षण (००)(०४) विद्यार्थी हरित सेना (२४०६ A१९४)	२२०.००	१५४.००	१७.११	१७.११	१७.११	१७.११	१७.११	१७.११	१७.११	१७.११	१७.१२	१५४.००

Vijay Ramchandra Khedekar

Digitally signed by Vijay Ramchandra Khedekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b4a0f51184eb8e42644affc326f734133e2da973d24448c2cf323cb1cb2e347e, cn=Vijay Ramchandra Khedekar
Date: 2018.05.21 17:41:15 +05'30'

(विजय खेडेकर)

अवर सचिव, महसूल व वन विभाग